# होमा सेंद्रिय कृषी

रोगाचा प्रतिबंध करण्यासाठी व उपयुक्त कीटक (प्रीडेटर्स) निर्माण होण्यासाठी वातावरणामध्ये पोषकद्रव्ये वेगाने पसरवण्याचे काम होमा कृषी पद्धतीचा अंगीकार केल्याने होते.

होमा थेरेपीच्या प्राचीन विज्ञानानुसार वनस्पती व जमीनीचे 75% पेक्षा जास्त पोषण वातावरणाद्वारे होते. होम प्रक्रियेने वातावरण जर आपण अधिक पोषक व आल्हाददायक केले तर एक प्रकारचे सुरक्षा कवच वनस्पतीभोवती निर्माण होते व रोगराई, रोगजन्तु, बुरशी यांचा प्रादुर्भाव होत नाही. वनस्पतींची श्वसनशक्ति वाढते आणि वातावरणातील विषारीपणा की जो वनस्पतींना घातक गळफासाप्रमाणे असतो त्याचे निराकरण होते.

होमा थेरेपी मधील प्राथमिक क्रिया म्हणजे अग्निहोत्र. सूर्याचे प्रथम किरण येतात त्या विशिष्ट क्षणाला ही अग्निहोत्राची क्रिया केली जाते. सूर्याच्या या पहिल्या किरणांच्या आगमनाचा परिणाम होऊन संपूर्ण वातावरण शुद्ध होते. अर्थात त्या विशिष्ट क्षणाला अग्निहोत्र केले गेले तर.

प्राचीन विज्ञानामध्ये सूर्योदय या घटनेचे वर्णन केले आहे ते पुढीलप्रमाणेः
''सूर्योदयाचे समयी अगणित अग्नी, विद्युत, ईथर आणि अनेकानेक सूक्ष्म ऊर्जा सूर्यापासून प्रवाहित होऊन पृथ्वीचे दिशेने झेपावतात आणि जेथे सूर्य उगवला असे म्हटले जाते तेथे हा प्रकाशझोत पूरसदृश परिणाम घडवतो. हा महाप्रवाह मार्गात जे जे आढळेल त्याचे शुद्धिकरण करून त्यास नवचैतन्य देतो. आणि जे जे अशुद्ध असेल ते ते नष्ट करतो. जीवनास चैतन्य देणारा ऊर्जांचा हा प्रचंड झोत सर्व जीवसृष्टीस अत्यानंदित करतो. सूर्योदयाचे क्षणी हे दैवी संगीत ऐकू येते. सूर्योदयाचे वेळेचा अग्निहोत्र मंत्र या दैवी संगीताचे सार आहे. त्या ऊर्जा महाप्रवाहाचे ते सारतत्व (क्विन्टेसेन्शियल साऊंड) आहे. सूर्यास्ताचे समयी हा दिव्य प्रकाश झोत परत माघारी येतो.''

शेकड़ो हेक्टर जमीनीवर होमा सेंद्रिय कृषीचे जमीन, पाणी व वनस्पतीवरील सुपरिणाम दिसून आले आहेत. त्यासंबंधी तज्ञांचे अहवाल आमचेकडे आहेत. अग्निहोत्र भस्म मानवावरील तसेच वनस्पती व प्राणिमात्रांवरील उपचारांसाठी चांगले लागू पडते. अग्निहोत्र हे मानसोपचारासाठीही प्रभावी साधन आहे.

प्राचीन परंपरेत असे म्हटले आहे की जमीनीचे पोषण वातावरणातून केले गेल्याने बऱ्याच गोष्टी प्राप्त होऊ शकतात. आम्ही त्या तपासल्या नाहीत पण त्यांचे परिणाम सर्वत्र आढळतात. त्यापैकी काही उदाहरणे पुढीलप्रमाणेः

- प्रदूषणामुळे कॅन्सर रोग निर्माण करणारे घटक जमीन, पाणी व हवेत आढळतात. वातावरणावरील या घटकांचा परिणाम व तीव्रता केवळ अग्निहोत्रामुळे कमी होऊ शकते.
- प्रदूषणामुळे कीटकांचे जेनेटिक् स्थित्यंतर होते. एकदा का हे स्थित्यंतर वाढू लागले की भयानक परिस्थिति निर्माण होते. कीटक पिकांवर हल्ला करतात व पीकांचा नाश करतात. त्यांना नियंत्रित करणारे परभक्षी कीटक (प्रीडेटर्स) नाहीत. यात आणखी दुष्काळ, महापूर व इतर नैसर्गिक संकटांची भर पडली तर लोकांची उपासमार ठरलेली ! अग्निहोत्राचे वातावरण हाच फक्त यावरील हमखास उपाय आहे.
- पॅरॅसिटिक बॅक्टिरीयांच्या संख्येत लक्षणीय वाढ झाल्याने असे जीवाणू भूमीतील पोषणद्रव्ये हिरावून घेतात. अग्निहोत्राचे वातावरण ही पोषणद्रव्ये टिकवून ठेवते व त्यांची झीज़ भरून काढते.
- प्रदूषणामुळे कीटकांचे संकरीकरण होऊन नवनव्या प्रजाती उत्पन्न होतात. कीटक आपले जीवनचक्र बदलतात व थंडी पासून संरक्षणासाठी त्यांचात प्रतिकारक्षमतेता विकास होतो यामुळे कृमि–कीडींची संख्या वाढते आणि पिकांवर रोगराईची लागण होऊन भरमसाठ नुकसान होते. अग्निहोत्र आचरणाने ही परिस्थिति पालटते व सुपरिणाम दिसून येतो.
- जमीनीमधील पोषणद्रव्यांचे प्रमाण घटत जाते आणि याचा अन्नधान्य पुरवठ्यावर मोठा गंभीर परिणाम होतो. जीवाणूंच्या रासायनिक व मॉलेक्यूलर रचनेत बदल होतो आणि पारंपारिक औषधी उपायाना ते दाद देत नाहीत. होमा थेरपी आचरणात आणली तर परिस्थितीत इष्ट तो बदल होऊन सुधारणा होऊ शकेल.
- जेव्हा रेडियोॲक्टीव्ह कण व विषारी वायू भूगर्भातून उत्सर्जित होतात तेव्हा आमचे संरक्षण होमा थेरेपीच करील.